पुढारी

# हिवाळी सत्र परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

## महापुराचा फटका : शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ मध्ये होणाऱ्या हिवाळी सत्र परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबत परिपत्रक परीक्षा विभागाने संलग्नित महाविद्यालयांना पाठविले आहे.




विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे हिवाळी सत्र परीक्षेच्या प्रारंभ तारखा व परीक्षेसाठी अर्ज करण्यासंदर्भातील तारखा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. मात्र, कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत उद्भवलेल्या पूरस्थितीमुळे महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे बऱ्याच महाविद्यालये, अधिविभागांतील विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरता आले नाहीत. आता विनाविलंब शुल्कासह ३१ ऑगस्ट, विलंब शुल्कासह १ ते ७ सप्टेंबर व अतिविलंब शुल्कासह ८ ते १४ सप्टेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहेत. परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या तारखांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# स्वच्छतेसाठी सरसावली प्राचार्य असोसिएशन

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठत प्राचार्य असोसिएशनतर्फे पूरग्रस्त भागात स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय झाला. पूरग्रस्त भागातील स्वच्छता मोहिमेत सर्वच कॉलेजमधील एनएसएस, एनसीसी विभागातील स्वयंसेवक ताकतीनिशी उतरतील अशी ग्वाही प्राचार्यांनी दिली. पूरग्रस्त भागात सुविधा निर्माण करण्यासाठी प्रशासनासोबत काम करतील असेही स्पष्ट केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कमला कॉलेजमध्ये असोसिएशनची सहविचार सभा झाली. आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी उपस्थित होते.

आयुक्त कलशेट्टी म्हणाले, 'महापालिकेतर्फे गेली चार महिने प्रत्येक रविवारी स्वच्छता मोहीम सुरू आहे. यामध्ये कॉलेज युवकांचाही सहभाग आहे. कॉलेजतर्फे राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमेला पालिका सहकार्य करेल.'

प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष

## एनएसएस, एनसीसी स्वयंसेवक देणार योगदान

डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, 'कोल्हापुरातील महापुराचे पाणी ओसरले असले तरी सर्वत्र स्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे. शहर आणि परिसरातील स्वच्छता मोहिमेत सर्व कॉलेज सहभागी होतील.'

प्र-कुलगुरू शिर्के म्हणाले, 'विद्यापीठातर्फे चौदा कॉलेजमधील पथके पाठविली आहेत. स्वच्छतेचा आराखडा तयार केला आहे.'

प्राचार्य डॉ. सुरेश गवळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी आभार मानले. संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य प्रवीण चौगुले, प्राचार्य एस. वाय. होनगेकर, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्राचार्य पी. आर. शेवाळे, प्राचार्य राजेखान शानेदिवाण, प्राचार्य पी. के. पाटील आदी उपस्थित होते.



पुढारी

# महाविद्यालयीन शिक्षकांच्या स्थान निश्चितीबाबत उद्यापासून मुलाखती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगानुसार सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकपदी (स्टेज ४ व ५) स्थाननिश्चितीसाठी विद्यापीठामार्फत केंद्रीय पद्धतीने २० ऑगस्टपासून कॅसअंतर्गत मुलाखती घेण्यात येणार आहेत. ज्या शिक्षकांनी सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (स्टेज ४ व ५) स्थाननिश्चिती करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यांना कामकाजाच्या सोयीसाठी व स्थाननिश्चिती निवड समितीसमोर विषयानुसार प्रेझेंटेशन करण्यासाठी व प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. १९ सप्टेंबरपर्यंत या मुलाखती चालणार आहेत. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती संलग्नता विभागाचे उपकुलसचिव एम. पी. कदम यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 AUG 2019
तरुण भारत

# पूरग्रस्त महाविद्यालयांची कुलगुरूंनी केली पाहणी

## महावीर व शहाजी कॉलेजला विद्यापीठ मदत करणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न शहरातील शहाजी छत्रपती महाविद्यालय आणि महावीर महाविद्यालय येथे महापुराचे पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. या दोन्ही महाविद्यालयांची कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी नुकतीच पाहणी केली. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड उपस्थित होते.

शहाजी महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील सर्व खोल्यांमध्ये पुराचे पाणी निम्म्याहून अधिक उंचीपर्यंत चढले होते. यामुळे तळमजल्यांवरील वर्गखोल्यांसह प्रशासकीय कार्यालय आणि विशेषतः रसायनशास्त्र विभागाची प्रयोगशाळा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे महावीर महाविद्यालयातील महिला वसतीगृहाच्या तळमजल्यावरील सभागृह आणि तेथील ग्रंथालय, त्याचप्रमाणे त्यांच्या प्रांगणातील आचार्य विद्यानंद संस्कृती भवन या सभागृहाच्या तळमजल्यात पूर्णतः पाणी भरले होते. दोन्ही महाविद्यालयांना परिस्थितीतून सावरण्यास आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे कुलगुरूंनी आश्वासन दिले. महावीर महाविद्यालयाने पूर कालावधीत महाविद्यालयाच्या सुरक्षित इमारतीमध्ये सत्तरहून अधिक पूरग्रस्तांना निवारा दिल्याबद्दल महाविद्यालयाचे कुलगुरूंनी अभिनंदन केले. तसेच त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमार्फत कोठे कोठे स्वच्छता मोहीम राबविता येऊ शकेल, याचीही चाचपणी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 AUG 2019

Times of India

# University extends exam application deadline to August 31

**Kolhapur:** The recent floods have forced the Shivaji University-Kolhapur (SUK) to extend the exam application deadline by a week — from earlier August 22 to the updated August 31 — with regular fees.

Students can submit their applications with a late fee until September 7 and with super-late fee until September 14.

According to an August 14 circular from G R Palase, the acting director, Board of Examinations and Evaluation, SUK, due to the emergency leaves granted to the colleges and the university departments during the heavy rains and flood situation across the Kolhapur and Sangli districts, many students are yet to fill and submit the upcoming semester examination forms. "Hence, to avoid any academic loss to any such student, the varsity is extending the deadline," added the circular.

SUK, via its August 1 circular, had invited applications for its winter semester examinations, which are going to commence from October 15. The exam department of the university had announced its semester examination dates for over 500 undergraduate and postgraduate courses with the circular back then.

The date for colleges to submit the list of students for the exam has been set at September 18 with super-late fee, stated the university circular.

According to the university circular, a detailed schedule for each course will be released soon, however, the date of commencement of respective exams has already been announced in the past circular, which is available on the varsity website.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 AUG 2019
Times of India

# SUK students take up cleanliness drive

Students of Shivaji University, Kolhapur (SUK) undertook cleanliness drives in various parts of the city which were severely affected by the recent floods.

On Independence Day, vice-chancellor Devanand Shinde, pro-VC DT Shirke, registrar Vilas Nandavadekar, among other authorities participated in the cleanliness drive undertaken in Laxmipuri and several other areas. Municipal commissioner Mallinath Kalshetti too participated in the activity.



V ice-chancellor Devanand Shinde, pro-VC DT Shirke, registrar Vilas Nandavadekar, among other authorities of SUK participated in the cleanliness drive

**CAMPUS BUZZ**

**Vivekanand College staff donate one-day salary:** Vivekanand College's teaching and non-teaching staff will be donating a day's salary to for the flood victims across the district. College students, who are part of the National Service Scheme (NSS) and National Cadet Corps (NCC), are engaged in rescue operations across the city.

"Students are actively participating in the cleanliness and rehabilitation activities across the city. The college had decided to provide financial aid even during the Kerala floods last year," said college authorities.

**Workshop on modern civil engineering software:** A workshop on modern civil engineering software was conducted at the DKTE Institute of Textile and Engineering recently. Experts from the field guided the participants about the latest softwares. Considering the advanced changes the modern day civil engineering and architecture is going through, the workshop played a pivotal role in helping students learn about the developments.

# एका दिवसात ७५० टन कचरा उठाव

## महास्वच्छता मोहिमेचा सलग सतरावा रविवार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महापुरानंतर शहरात झालेला निसरडा चिखल, लोकांनी रस्त्यावर टाकलेले घरातील खराब साहित्य यामुळे बकालता आली आहे. महापालिका प्रशासन कचरा हटवण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम राबवत आहे. तसेच आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी हाती घेतलेल्या स्वच्छता मोहिमेच्या सतराव्या रविवारी (दि. १८) ७५० टन गाळ, कचरा उठाव करण्यात आला. यावेळी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांची उपस्थिती होती.

पूर ओसरल्यानंतर पंचगंगा तालीम रोड, दुधाळी, मस्कुती तलाव, उत्तरेश्वर पेठ, जुना बुधवार पेठ, सिद्धार्थनगर, सीता कॉलनी, पंचायत समिती करवीर, रिलायन्स मॉल मागे, बसंत-बहार रोड, व्हीनस कॉर्नर, शाहूपुरी पाचवी, सहावी, नववी गल्ली, कुंभार गल्ली, लक्ष्मीपुरी, खानविलकर पेट्रोल पंप रोड, रमणमळा, न्यू पॅलेस, कमदवाडी, जाधववाडी, बापट कॅम्प, नंदनवन पार्क, केव्हीज पार्क या परिसरात चिखलाची दलदल झाली आहे. या परिसरात स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर राबवण्यात येत आहे. रविवारीही येथे चिखल काढण्यात आला. कचरा, प्लास्टिक, पुराच्या पाण्याने खराब झालेल्या वस्तूंचा उठाव करण्यात आला. त्यासाठी महापालिकेची सर्व यंत्रणा सक्रिय करण्यात आली होती. यामध्ये १६५ टिपर, ५५ डंपर, ८ आरसी गाड्या आणि १५० ट्रॅक्टर ट्रॉल्यांच्या साहाय्याने एकूण ३७८ खेपा करून ७५० टन कचरा व गाळ गोळा करण्यात आला.



कोल्हापूर : शहरातील स्वच्छता मोहिमेत सहभागी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, नागरिक. (छाया : एस. अली)

या मोहिमेत महापालिकेच्या ६ जेसीबी आणि १० डंपर, देवस्थान समितीचे ४ जेसीबी आणि ४ डंपर, डी. वाय. पाटील ग्रुप, सत्यजित कदम, व्ही. बी. पाटील यांच्याकडून प्रत्येकी १, तर जेसीबी इंडिया असोसिएटस्‌चे २ जेसीबीच्या साहाय्याने उठाव करण्यात आला. महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसह नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे ३० कर्मचारी, पोलीस अधिकारी व १०० कर्मचारी, जय महाराष्ट्र संस्थेचे ४० नागरिक, सिलिंग मिल यवलूजचे ५० स्वयंसेवक, विवेकानंद कॉलेजचे २५ विद्यार्थी व विद्यार्थिनी, स्वरा फौंडेशनचे ४० कार्यकर्ते, एकटी संस्थेच्या २५ महिला, रिलायेबल पेस्ट कंट्रोल २०, नागरिका एक्स्पोर्टस् यवलूजचे ३० कर्मचारी, नवी मुंबई महानगरपालिकेचे ८० सफाई कर्मचारी, देवस्थान समितीचे ८० सफाई कर्मचारी, बीव्हीजी कंपनीच्या ८५ सफाई कर्मचाऱ्यांनी मोहिमेत सहभाग घेतला.

यावेळी नगरसेवक राहुल चव्हाण, अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, सहायक आयुक्त संजय सरनाईक, परिवहन विभागाचे अधिकारी राजेंद्र मदने, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उपशहर अभियंता रमेश मस्कर, रावसाहेब चव्हाण, रमेश जाधव, हर्षजित घाटगे, उपशहर रचनाकार नारायण भोसले, पशुवैद्यकीय अधिकारी विजय पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, अमर समर्थ, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, पर्यावरणचे उदय गायकवाड, आरोग्य निरीक्षक शुभांगी पोवार, अरविंद कांबळे, नंदू पाटील, श्रीराज होळकर, करण लाटवडे, शिवाजी शिंदे, मुनिर फरास यांच्यासह मुकादम व सफाई कर्मचाऱ्यांनी मोहीम राबवली.



# कुलगुरू पुसताहेत पूरग्रस्तांचे अश्रू

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्ह्यात महापुराने थैमान घातले. या परिस्थितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी प्रशासन गतिमान केले. अद्यापही ते त्यांच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्यात व्यस्त आहेत. ज्या भागात पुराचे पाणी आले होते, त्या भागात विद्यापीठातर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कुलगुरूंनी स्वतः या मोहिमेत सहभागी होत स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिले. त्यांनतर त्यांनी कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरबाधित महाविद्यालयांना भेटी दिल्या. या महाविद्यालयांची दयनीय अवस्था पाहून संवेदनशील मनाच्या कुलगुरूंना गहिवरून आले. शिवाजी विद्यापीठात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्याचा निश्चय कुलगुरू शिंदे यांनी केला. साहित्य, सहाय्य आणि प्रशिक्षण अशा तिहेरी स्वरूपाची भूमिका या केंद्राच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ बजावेल. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, डिग्री प्रमाणपत्रे आदींचे पुरामुळे नुकसान झाले असेल, त्यांनी योग्य पुरावे प्रदर्शित केल्यास त्यांना कागदपत्रे विद्यापीठाकडून मोफत उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा राबवली जात आहे.

लोकमत

# विद्यापीठाकडून दहा लाख लिटर पाण्याचा पुरवठा

## आपत्ती काळात मदत; शहरवासीयांना दिलासा; समुपदेशन कक्षही स्थापणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शहरातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई ओळखून गेल्या चार दिवसांत शिवाजी विद्यापीठाच्या जलशुद्धिकरण केंद्रामधून सुमारे दहा लाख लिटरहून अधिक पाणी शहरवासीयांना उपलब्ध करून देण्यात आले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी येथे दिली.

अतिवृष्टी आणि महापुरामुळे शहराला पाणीपुरवठा करणारी महानगरपालिकेची जल शुद्धीकरण यंत्रणा पाण्याखाली जाऊन नादुरुस्त झाली आहे. त्यामुळे सभोवती पुराचे पाणीच पाणी असूनही नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली. शहरातील ही परिस्थिती लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने गेल्या चार दिवसांपासून महानगरपालिका प्रशासनाच्या



सहकार्याने विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण केंद्रातील पाणी पालिकेच्या आणि अन्य टँकरमधून पाणीपुरवठा सुरु केला. यामुळे शहरबासीयांना दिलासा आहे. यंदा विद्यापीठाने महापूर स्थितीत पाणीटंचाईग्रस्त असलेल्या कोल्हापूर शहराला आपल्या क्षमतेनुसार दिवसाला सरासरी दोन ते अडीच लाख लिटर इतके शुद्ध पाणी पुरविण्यात यश मिळविले आहे. महापालिकेच्या टँकरसह सर्वसामान्य नागरिकांची सुमारे चारशे ते पाचशे वाहने कॅम्पसवरुन दैनंदिन पिण्याचे पाणी घेऊन जात आहेत. जिल्ह्याच्या अनेक भागांत पूर आल्याने आणि तेथील पिकेच्या पिके पाण्याखाली गेल्याने जनावरांचा चारा-वैरणीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन गेल्या चार दिवसांत सुमारे ४० ट्रॉली चारा विद्यापीठाच्या कॅम्पसवरुन आपत्तीग्रस्त भागातील जनावरांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आपत्तीग्रस्तांना जीवनावश्यक वस्तू, वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या दृष्टीनेही विद्यापीठ शिव सहायता-आपत्ती निवारण कक्षाच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### आपत्तीग्रस्तांसाठी समुपदेशन कक्ष

शहरातील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय आणि महावीर महाविद्यालय येथे महापुराचे पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीची कुलगुरु डॉ. शिंदे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड होते. या सर्वांनी शिवाजी पूल, कुंभारवाडा, शाहूपुरी, हुतात्मा पार्क आदी परिसरात फिरुन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमार्फत कोठे कोठे स्वच्छता मोहीम राबविता येऊ शकेल, याची चाचपणी केली. आपत्तीग्रस्तांना या परिस्थितीतून सावरण्यासाठी पुढील टप्प्यात समुपदेशनाची मोठी गरज असल्याची बाब लक्षात घेऊन विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यू विभागातर्फे समुपदेशन कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. समुपदेशन करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन दोन प्राध्यापकांसह तीस विद्यार्थ्यांचे पथक तयार करण्यात येणार आहे.